# सुधारीत हमीपत्र

**गणेशोत्सव २०२३ साजरा करण्याच्या परवानगीसाठी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी सादर करणे आवश्यक असलेले हमीपत्र (सदर हमीपत्र ऑनलाईन सिस्टीममधून डाऊनलोड करावे. ते योग्यरित्या भरुन स्वाक्षरी करुन परत अर्ज भरताना ऑनलाईन प्रणालीमध्ये अपलोड करावे).**

मी / आम्ही (गणेशोत्सव मंडळाचे नाव व पत्ता)________________ अध्यक्ष (अध्यक्षांचे नाव) __________ , व सचिव (सचिवांचे नाव) ____________________________________गणेशोत्सव २०२३ साजरा करणेसाठी खालील हमीपत्र सारासार विचार करुन देत आहोत.

१) आम्ही स्थापना करत असलेल्या शाडू/पर्यावरणपूरक साहित्याने घडविलेल्या मूर्तीच्या पाठीमागे उजव्या हाताच्या खांद्यावर एक इंच आकारमानाचे 'वर्तुळ' हि खूण हिरव्या रंगाची / पीओपीची मूर्ती असल्यास त्यावर लाल रंगाची खूण सुस्पष्ट दिसेल अशा प्रकारे उमटवलेली असेल याची आम्ही खात्री करु .

२) आमच्या सार्वजनिक मूर्तीचे विसर्जन आम्ही मंडपालगतच्या कृत्रिम तलावातच करण्याचा प्राधान्याने प्रयत्न करु.

३) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक सूचना पाळण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करु. सार्वजनिक गणेशोत्सवासाठी यावर्षी स्थापित करण्यात येणारी मूर्ती शक्यतोवर कमीतकमी उंचीची ठेवू.

४) ध्वनी प्रदूषणाच्या अनुषंगाने विहीत करण्यात आलेल्या नियमांचे पालन करुन आजूबाजूला असलेल्या रुग्णांना त्रास होणार नाही याची दक्षता घेवू.

५) बृहन्मुंबई म.न.पा. व पोलिस प्रशासन यांनी घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करु.

६) काही विशिष्ट परिस्थितीत दिलेली परवानगी काढून घेण्याचे अधिकार महानगरपालिका राखून ठेवत आहे, हे आम्हाला मान्य आहे.

७) सन २०२३ च्या सार्वजनिक उत्सवांसंदर्भात वेळोवेळी देण्यात आलेल्या निर्देशांचे उल्लंघन झाल्यास, संबंधित, 'पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६' अन्वये कारवाईस पात्र ठरेन हे आम्हाला मान्य आहे.

(________________________________)

नाव ________________________, अध्यक्ष

गणेशोत्सव मंडळ ____________________

(________________________________)

नाव ________________________, सचिव

गणेशोत्सव मंडळ ____________________